तरी मा.स्थायी समितीचे दिनांक ०१/०२/२०२१ रोजी दुपारनंतर निवृत्त होणा-या, या अहवालामध्ये नमुद केलेल्या आठ सदस्यांचे जागी वर उल्लेख केलेल्या बलाबलानुसार मान्यताप्राप्त पक्षाचे , नोंदणीकृत पक्षाचे, गटाचे, आघाडीचे अथवा फ्रंटचे नविन ८ सदस्य नामनिर्देशनाव्दारे स्थायी समितीवर नियमानुसार नेमणेकामी प्रस्ताव मा.महासभेपुढे निर्णयार्थ सादर करण्याच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, पृष्ठ क्र.३ मधील अ मध्ये नमुद केलेले १ ते ८ स्थायी समिती सदस्य निवृत्त होत असल्याने त्यांचा जागेवर नोंदनिकृत पक्षाच्या संख्याबळानुसार नविन सदस्य नियुक्ती स्थायी समितीवर नेमणेकामीचा प्रस्ताव मा.महासभेकडे पाठविण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

**चर्चा :-**

**मा.महापौर साहेब :-** गटनेत्यांनी स्थायी समितीच्या सदस्य पदाकरीता पक्षांनी नावे द्यावीत.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** नॅशनॅलिस्ट कॉग्रेस पार्टीचे गटनेते यांनी बंद पाकिट मा.महापौर यांचेकडे सुपुर्द केले.

**मा.श्रीमती.रोहिणी शेंडगे :-** शिवसेनेच्या गटनेत्या यांनी बंद पाकिट मा.महापौर यांचेकडे सुपुर्द केले.

**मा.श्री.मुदस्सर शेख :-** बहुजन समाज पार्टीचे गटनेते यांनी बंद पाकिट मा.महापौर यांचेकडे सुपुर्द केले.

**मा.श्रीमती.मालनताई ढोणे :-** भारतीय जनता पार्टीचे गटनेते यांनी बंद पाकिट मा.महापौर यांचेकडे सुपुर्द केले.

**मा.महापौर साहेब :-** बंद पाकिटामधील स्थायी समिती सदस्यांची नावाचे वाचन केले.

**मा.श्रीमती.मालनताई ढोणे :-** भारतीय जनता पार्टीचे गटनेते यांनी सुचविलेली दोन स्थायी समिती सदस्यांची नांवे १) ताठे वंदना विलास, २) बारस्कर रविंद्र रावसाहेब

**मा.श्री.संपत बारस्कर :-** नॅशनॅलिस्ट कॉग्रेस पार्टीचे गटनेते यांनी सुचविलेली दोन स्थायी समिती सदस्यांची नांवे १) घुले अविनाश हरिभाउ २) खान समद वहाब

**मा.श्रीमती.रोहिणी शेंडगे :-** शिवसेनेच्या गटनेत्या यांनी सुचविलेली तीन स्थायी समिती सदस्यांची नांवे १) शिंदे सचिन चंद्रशेखर २) गायकवाड परसराम बाळू ३) भाकरे रिता शैलेश

**मा.श्री.मुदस्सर शेख :-** बहुजन समाज पार्टीचे गटनेते यांनी सुचविलेले एक नांव १) शेख मुदस्सर जहॉगीर

**मा.महापौर साहेब :-** स्थायी समितीच्या आठ सदस्यपदी नविन स्थायी समिती सदस्यांची विधीग्राहयरित्या नामनिर्देशनाव्दारे नेमणुक झाल्याचे मी घोषित करीत आहे. निवड झालेल्या सर्व सदस्यांचे हार्दीक अभिनंदन.

--*--

**ठराव :-**

ठरविण्यांत येते की, अहमदनगर महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीच्या निवृत्त होणा-या आठ सदस्यांच्या जागी नविन आठ सदस्यांची नेमणूक विशेष सभेव्दारे करणे बाबतच्या सभेमध्ये सर्व पक्षाच्या

